# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


क्र : मविनिआ/माअअ/63/2018/228 दि.29.09.2018

प्रति,
श्री. त्रिभुवन मावजी दाठिया
एच/१०, जनकल्याण को-ऑप. हौ. सो.,
पी.एम.जी.पी. कॉलनीच्या बाजूला,
मानखुर्द, मुंबई-४०००४३.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दिनांक १५.०९.२०१८ रोजीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) अन्वये आयोगाच्या कार्यालयास दि. २१.०९.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

1. **रिलायन्स एनर्जी लिमिटेड कंपनीला .......**

- रिलायन्स एनर्जी लिमिटेड (नवीन कंपनीचे नाव अदानी इलेक्ट्रीसिटी लि.) यांना दिनांक ११ ऑगस्ट, २०११ रोजी देण्यात आलेल्या प्रकरण क्र. २०११ चे ६५ यांमधील वीज पुरवठा परवाना मंजुरीचा आदेश पहावा. सदर आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या www.merc.gov.in आणि www.mercindia.org.in या संकेतस्थळावर मोफत स्वरुपात उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

2. **सरकार तर्फे कंपनीला कोणते नियम आणि अटी .......**

- ११ ऑगस्ट, २०११ रोजी आयोगातर्फे रिलायन्स इनफ्रास्ट्रकचर्स लिमीटेड ला देण्यात आलेल्या विद्युत वितरण परवान्याची प्रत आयोगाच्या वरील नमूद केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

3. **रिलायन्स कंपनी दरवेळेस घेत असलेले .....**

- विद्युत अधिनियम २००३ नुसार रिलायन्स कंपनी ग्राहकांकडून सिक्युरिटी डिपॉझिट घेण्याकरिता प्राधिकृत आहे.


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

4. **सरकारने विजेच दर कंपनी कोणत्या .....**
5. **या कंपनीला फिक्स चार्ज .....**

- रिलायन्स इनफ्रास्ट्रकचर्स व इतर वीज वितरण परवान्याधारक कंपन्यांनी विद्युत ग्राहकाकडून वसूल करावयाचे आकार आयोगाने वेळोवेळी पारित केलेल्या टॅरिफ ऑर्डर मध्ये नमूद केलेले असतात. आयोगाने रिलायन्स इनफ्रास्ट्रकचर लि. करिता पारित केलेली टॅरिफ ऑर्डर (प्रकरण क्र. २०१७ चा २००) आयोगाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती करिता उपलब्ध आहे. तसेच Maharashtra Tax on sale of Electricity १९६३, Maharashtra Electricity Duty Act २०१६ अंतर्गत वीज वितरण परवानाधारक गव्हरमेंट इलेक्ट्रीसिटी डयुटी, महाराष्ट्र गव्हरमेंट टॅक्स ऑन सेल ऑफ इलेक्ट्रीसिटी ग्राहकांकडून वसूल करतात.

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

Mohan

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी